

"मी काय करू बाई" ...

**प्रसंग -**

पुष्कळ नवऱ्यांना 'केव्हा' 'काय' करायचे असते हे कळत नाही. बिचारी 'मीना' (नायिका नम्बर २) लग्नाला १ वर्ष झाले. आज त्यांची FIRST WEDDING ANNIVERSARY. पण अविनाश हा अगदीच अरसिक नवरा बघा. गेल्या वर्षी हा हनीमूनला आकाशातल्या चंद्राकडे बघत गात बसला होता तर ह्यावेळेस पोट-दुखीचा त्रास आहे अशी ह्याची तक्रार .....



# मी काय करू बाई ...

(चाल - मै क्या करू राम मुझे बुढ्ढा मिल गया )

मीना - मी काय करू बाई, अस्सा नवरा मिळाला
मला हा नवरा मिळाला, असा एक नवरा मिळाला
मी काय करू बाई ....

हनीमूनला गेलो होतो, आम्ही उटकमंडला
चांदण्यात वाटल मला, नेईल प्रेम करायला
पण रात सारी रागदारी, गात हा बसला
ताना हा मारत हो बसला, तबला वाजवीत हो बसला.
मी काय करू बाई ....

दागिन्याची हौस मला, आवडते नटायला
नवरत्नाचा हार वाटलं, आणेल हा घालायला
पण वेळ नाही ह्याला, साधी हौस पुरवायला
मला हो खूष करायला, थोड्याशा साड्या आणायला
मी काय करू बाई....

ह्याला म्हटले जाऊ आपण, सेकंड हनीमूनला
'हेडेक' ह्याचा सुरू, लागतो पोट की आवळायला
मी व्हायागरा आणते, याला बर करायला
थोडासा तगडा करायला, खरा हो नवरा करायला.
मी काय करू बाई .....